RNI NO. MAHMAR/25/A3029
लातूर
वर्ष : ७ वे, अंक नं. : ९०
दि.२९ जुलै २०२६, वार : बुधवार
पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक
# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com
संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## मिरा-भाईंदरच्या फाऊंटन ते गायमुख घोडबंदर रस्त्याच्या दुरुस्तीला गती द्या-परिवहन मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील गायमुख ते फाऊंटन या घोडबंदर मार्गावरील रस्त्याच्या दुरुस्तीची कामे तातडीने व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. यासंदर्भात मंत्रालयात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

घोडबंदर रस्ता हा मिरा-भाईंदर परिसरातील नागरिकांसह मुंबई-ठाण्याकडे ये-जा करणाऱ्या हजारो वाहनचालकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. संबंधित सर्व यंत्रणांनी आपापली जबाबदारी निश्चित करून समन्वयाने दुरुस्तीची काम करावी आणि नागरिकांना लवकरात लवकर दिलासा द्यावा,असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

या बैठकीला मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त राधा बिनोद शर्मा, नगरविकास विभागाचे उपसचिव, शहर अभियंता, सहाय्यक संचालक, नगररचना तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. रस्त्याच्या दुरुस्तीची सद्यस्थिती, प्रलंबित कामे, संबंधित यंत्रणांची जबाबदारी तसेच कामे पूर्ण करण्यासाठी निश्चित कालमर्यादा याबाबत यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.

नागरिकांना सुरक्षित, खड्डेमुक्त आणि सुरळीत रस्ता उपलब्ध करून देणे ही महापालिका प्रशासनाची जबाबदारी आहे. विविध विभागांमधील समन्वयाअभावी कोणतेही काम रखडता कामा नये. घोडबंदर रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रश्न प्राधान्याने मार्गी लावून नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी आवश्यक निर्णय तातडीने घेतले जातील,'' असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.

## राज्यात २९ ते 31 जुलैदरम्यान विविध भागांत मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज



**मुंबई/प्रतिनिधी :** बंगालच्या उपसागराकडून येणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागांत २९ ते ३१ जुलैदरम्यान पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. या कालावधीत विदर्भ, उत्तर मराठवाडा, खानदेश, कोकण तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच विदर्भ, उत्तर मराठवाडा आणि खानदेशमध्ये वाऱ्याचा वेग वाढण्याचाही अंदाज आहे. तुलनेने मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राच्या दक्षिण भागात कमी पावसाची शक्यता आहे.

या काळात अतिवृष्टीसदृश पावसाच्या घटना घडू शकतात. त्यामुळे सखल भागांत पाणी साचणे, नदी-नाल्यांना पूर येणे, काही प्रमाणात संरचनात्मक नुकसान होणे, वाहतुकीवर परिणाम होणे तसेच काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात काही ठिकाणी दरड कोसळण्याचाही धोका आहे.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार, २९ जुलै रोजी कमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव प्रामुख्याने विदर्भात, विशेषत: पूर्व विदर्भात जाणवण्याची शक्यता आहे. ३० जुलै रोजी त्याचा प्रभाव पश्चिम विदर्भ, खानदेश, उत्तर मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर आणि कोकणात अधिक जाणवू शकतो. ३१ जुलै रोजी खानदेशातील काही भाग तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात पावसाचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता आहे.

मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशात ३० आणि ३१ जुलैदरम्यान पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. विशेषत: रायगड, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांत ३० जुलै रोजी पावसाची तीव्रता अधिक राहण्याचा अंदाज आहे.

विदर्भ, उत्तर मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील नागरिकांनी या कालावधीत सतर्क राहावे. विशेषत: सखल भाग, नदी-नाल्यांच्या परिसरात तसेच घाट रस्त्यांवरून प्रवास करताना अधिक काळजी घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा. राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराला लातूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**लातूर/ प्रतिनिधी:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी लातूर शहरातील पार्वती मंगल कार्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या समाधान शिबिराला लातूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या समाधान शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी पात्र लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात विविध योजनांच्या लाभाचे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी, पंचायत समिती सभापती श्रीकांत बैले, उपसभापती महेश चव्हाण, लातूरचे उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, विरोधी पक्षनेते देविदास काळे, जिल्हा परिषद गट नेत्या आशाताई भिसे, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख नसीम पटेल, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, जिल्हा परिषद सदस्य दिपाली आदमाने, श्रीकांत माने, सोनल थोरमोटे, महादेव म्हस्के, लातूर महानगरपालिका नगरसेवक विक्रांत गोजमगुंडे, अक्षय देशमुख, अदिती पाटील कव्हेकर, पंचायत समिती सदस्य तनुजा चव्हाण, सत्यनारायण पाटील, तालुका कृषी अधिकारी प्रमोद राठोड, गट विकास अधिकारी श्याम गोडभरले यांच्यासह जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य आणि पालिका नगरसेवक व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

समाधान शिबीराच्या माध्यमातून महसूलविषयक तक्रारी स्वीकारणे, विविध प्रमाणपत्रे व आभा कार्ड वाटप करणे, सामाजिक अर्थसहाय्य योजनेचा लाभ देणे, ई-केवायसी करणे, नवीन व दुय्यम डिजिटल शिधापत्रिका तसेच डिजिटल सातबारा व फार्मर आयडी देणे, मोजणी अर्ज स्वीकारणे व क-प्रत वाटप करणे, आधार नोंदणी व अद्ययावतीकरण आणि पाणंद रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षलागवड यांसारख्या सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

अध्यक्षीय भाषणात बोलताना उषाताई पाटील यांनी नागरिकांच्या अडचणींचे तातडीने निवारण करण्यासाठी हे शिबीर उपयुक्त ठरणार असल्याचे सांगत शासकीय योजनांचा शेवटच्या घटकापर्यंत लाभ पोहचवण्याचा प्रयत्न जिल्हा परिषदेच्या माध्यमातून केला जात असल्याचे सांगितले.

महसूल विभागामार्फत जिल्ह्यातील शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करण्याची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. भटके विमुक्त व दिव्यांगांसाठीच्या योजनांवर प्रशासन भर देत आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी सांगितले. तसेच राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी पात्र शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन आधार प्रमाणीकरण व ॲग्रिस्टॅक नोंदणी तातडीने पूर्ण करावी, तसेच सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा आणि विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर या उपक्रमातून ग्रामीण भागातील ३५० पेक्षा अधिक वाद सोडवले असून शहरी भागात पोलीस तुमच्या सोसायटीमध्ये व विद्यार्थी संवादातून सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन केले जात असल्याची माहिती पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी दिली. पोलीस प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा परिषद गटनेत्या आशाताई भिसे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, महानगरपालिका विरोधी पक्षनेते देविदास काळे, नगरसेवक विक्रांत गोजमगुंडे, माजी नगरसेवक अजित पाटील कव्हेकर यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी या समाधान शिबीरासोबतच मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले असून नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन केले जात असल्याचे सांगितले. तहसीलदार सौदागर तांदळे यांनी प्रास्ताविक करताना कर्जमुक्तीसाठी आधार प्रमाणीकरण व ॲग्रिस्टॅक नोंदणीसाठी १० स्टॉल्स लावण्यात आल्याचे नमूद केले. यावेळी मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची माहिती देणारी नाटिकाही सादर करण्यात आली. या प्रसंगी आरोग्य शिबिरासह विविध योजनांची माहिती व लाभ देण्यासाठी ३४ स्टॉल लावण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नायब तहसीलदार गणेश सरोदे यांनी केले.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

## आधार प्रमाणीकरणाची सुविधा पूर्ण मोफत; शेतकऱ्यांकडून शुल्क आकारल्यास कारवाई – जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या २ जून २०२६ च्या शासन निर्णयानुसार सुरू करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांसाठी आधार प्रमाणीकरण (ई-केवायसी) करण्याची सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील कोणत्याही आपले सरकार सेवा केंद्र किंवा व्हीएलई यांनी शेतकऱ्यांकडून या कामासाठी कसलेही शुल्क आकारू नये, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिले आहेत. तसेच असे शुल्क आकारले जात असल्याची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा तसे निदर्शनास आल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करण्याचा सूचनाही त्यांनी संबंधितांना दिल्या आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत थकबाकीदार शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी तर नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. योजनेच्या पात्र यादीत नाव आलेल्या शेतकऱ्यांनी नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन ई-केवायसी करणे आवश्यक आहे. प्रत्येक व्हीएलईने केलेल्या यशस्वी ई-केवायसीच्या संख्येनुसार लागणारे सेवा शुल्क महाआयटीतर्फे दरमहा अखेरीस थेट त्यांच्या वॉलेट खात्यात जमा केले जाणार असल्याने, केंद्रांनी शेतकऱ्यांकडून कोणतेही अतिरिक्त पैसे घेऊ नयेत अशा सूचना जिल्हा प्रशासनाने दिल्या आहेत. तसेच प्रत्येक केंद्रावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ई-केवायसी सेवा शेतकऱ्यांसाठी पूर्णतः विनामूल्य असल्याचे फलक लावण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यांतील एकूण ८९४ गावांतील पात्र शेतकऱ्यांची व्हीके लिस्ट - १ व २ प्रसिद्ध झाली असून, यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ३५ हजार ४१७ आणि राष्ट्रीयकृत तथा व्यापारी बँकांचे १९ हजार २५४ असे एकूण ५४ हजार ६७१ पात्र शेतकरी समाविष्ट आहेत. आतापर्यंत यापैकी १५ हजार ४८९ पात्र शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण यशस्वीरीत्या पूर्ण केले असून अजूनही ३९ हजार २१४ शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण शिल्लक आहे. योजनेचा लाभ लवकरात लवकर मिळावा यासाठी यादीमधील सर्व पात्र शेतकऱ्यांनी तात्काळ आपल्या जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन मोफत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

## शरद पवारांच्या 'एनडीए' सहभागावर चर्चांना उधाण, भाजपाच्या संकटमोचकांचं सूचक विधान

**जळगाव/प्रतिनिधी :** राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष सत्तेत सहभागी होणार असल्याच्या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले असतानाच ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी यावर सावध प्रतिक्रिया दिली आहे. शरद पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात नेमकी काय चर्चा झाली? हे कोणालाच माहिती नसल्याचे सांगत त्यांनी कोणतेही ठोस संकेत देण्यास नकार दिला. महाजन म्हणाले, ''शरद पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामध्ये काय चर्चा झाली, हे आपल्या कुणालाही माहिती नाही. या सगळ्या वावड्या आहेत की वस्तुस्थिती आहे, हे आज कोणीही सांगू शकत नाही. कारण शरद पवार हे वरिष्ठ पातळीवर थेट पंतप्रधान मोदी यांना भेटले आहेत. योग्यवेळी जे समोर येईल, तेव्हाच सत्य समजेल.शरद पवार हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना का भेटले हे आपण समजून घेतलं पाहिजे. विद्यार्थी आंदोलनात संवाद महत्त्वाचा आहे असं शरद पवार यांना वाटलं होतं. त्यामुळे शेतकरी आणि तरुणांचे प्रश्न यावर चर्चा करण्यासाठी शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.

# वंचित महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पद आणि १२ कार्यकारिणी सदस्य, संघटनात्मक निवडणूक २०२६/30जुलै रोजी संपूर्ण महाराष्ट्रात



राष्ट्रीय नेते : बाळासाहेब आंबेडकर आणि युवा नेते : सुजात (दादा) आंबेडकर यांच्या आदेशाने संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात ३० जुलैला मतदान प्रक्रिया पार पडणार..! महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदाचे इच्छुक उमेदवार : राजेंद्र (दादा) पातोडे यांचे सर्वसाधारण सभासद आणि हितचिंतक मतदार बंधू-भगिनींना जाहीर आव्हान...येत्या ३० जुलैला आपल्या इच्छुक उमेदवाराला मतदान करा..!!

-------------

**नवी मुंबई / के. एच. हनवते –** वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष इच्छुक उमेदवार : राजेंद्र (दादा) पातोडे यांचे नवी मुंबई जिल्ह्यात ''वंचित बहुजन आघाडी संघटनात्मक प्रचार दौरा दिनांक २५ जुलै २०२६ रोजी पंचशील बुद्ध विहार तुर्भे स्टोअर नवी मुंबई येथील कार्यक्रमास स्वतःहा उपस्थित राहून बेलापूर तालुका वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई जिल्ह्याच्या सर्व कार्यकर्त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

येत्या ३० तारखेला महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात मतदान केंद्रस्थानी उपस्थित राहून ''संविधानात्मक लोकशाही'' च्या मजबुतीसाठी : प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पद आणि नवीन १२ सदस्य कार्यकारिणी हि मतदान प्रक्रियेतून पहिल्यांदाच नव्याने निवड होणार आहे, ही निवडणूक वंचित बहुजन आघाडी नोंदणीकृत सभासदांच्या मतदान प्रक्रियेतून पार पडणार आहे, आपल्या इच्छुक उमेदवाराला प्रचंड मताने निवडून आनण्याचे जाहीर आव्हान पातोडे यांनी केले, आणि सर्वांना आश्वासित केले की, संपूर्ण महाराष्ट्रात संघटनात्मक बांधणी करून पुढील २०२९ च्या निवडणुकीला जे जे आपणास शक्य आहे ते आपण नक्कीच करणार..! जेणेकरून महाराष्ट्राचा भावी मुख्यमंत्री हा वंचित बहुजन आघाडीचाच असेल..! अशा पद्धतीचे आपले पुढील कार्य असेल अशी ग्वाही महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष इच्छुक उमेदवार : राजेंद्र (दादा) पातोडे यांनी कार्यकर्त्यांना दिले.

सदर कार्यक्रमास कार्यकारिणी इच्छुक उमेदवार : सारंग थोरात, कृष्णा देशमुख, दीपक (भाऊ) डोके यांनी प्रचारांसबंधी मोलाचे मार्गदर्शन केले सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी : विजय झणके (गुरुजी) भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष होते, सदर कार्यक्रमाचे आयोजक : नवी मुंबई जिल्हा महासचिव : सुनील भोले यांनी केले होते, त्यावेळी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : अश्वजीत जगताप, नवी मुंबई जिल्हा कार्याध्यक्ष : संतोष जाधव, वंचित बहुजन महिला आघाडी जिल्हाध्यक्ष : शिल्पाताई रणदिवे, महिला आघाडी महासचिव : साक्षी ताई लोटे, तसेच पंचशील बुद्ध विहार अध्यक्ष : सतीश खंडाळे, सुभाष बलखंडे, राहुल शिरसाट इत्यादी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते, सदर कार्यक्रमास महिलांची उपस्थिती अधिक होती या सर्व कार्यक्रमाचे भारदस्त सूत्रसंचालन : कल्याणराव हनवते (मा. उपाध्यक्ष) बेलापूर तालुका वंचित बहुजन आघाडी यांनी केले.

## संपादकीय...

## तापमानवाढ अन् वणवे पेटू लागले..

पश्चिम युरोपमधील फ्रान्स आणि स्पेन हे दोन देश सध्या जंगलांमध्ये भडकलेल्या वणव्यांच्या समस्येशी झुंजत आहेत. आग वेगाने पसरत चालल्यामुळे दोन्ही देशांमधील तीन लाखांहून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवावे लागले आहे. स्पेनमधील माद्रिद, आविला आणि तोलेदो भागांमध्ये परिस्थिती बिकट असून, स्पेन सरकारने राष्ट्रीय आणीबाणी जाहीर केली आहे. फ्रान्समध्येही कमी-अधिक फरकाने अशीच स्थिती आहे. जंगलांमध्ये पेट घेणारे वणवे आपल्याला नवे नाहीत. बहुतेकदा वणव्यांची कारणे मानवनिर्मित असतात. पण यामध्ये जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदल हेही एक प्रमुख कारण आहे. जगभरातील जंगलांमध्ये आता वणव्यांचा हंगाम अधिक लवकर सुरू होतो आणि पूर्वीपेक्षा अधिक काळ टिकतो. यामागे तीन प्रमुख कारणे आहेत. पहिले म्हणजे सातत्याने वाढणारे तापमान, विशेषतः रात्रीचे तापमान कमी न होणे. दुसरे म्हणजे पर्जन्यमानात होणारी घट आणि वाढती कोरडी परिस्थिती. तिसरे कारण म्हणजे हिमाच्छादित प्रदेशांमध्ये बर्फ अपेक्षेपेक्षा लवकर वितळणे. युरोप म्हटले की बर्फाची चादर पसरलेला निसर्ग, उणे तापमान, रंगबिरंगी पानांनी बहरलेली झाडे, पर्णवृष्टीच्या आच्छादनात झाकलेले रस्ते असा नितांतसुंदर निसर्ग आणि आल्हाददायक वातावरण डोळ्यांसमोर येते. परंतु १९८० च्या दशकापासून युरोपचे तापमान जागतिक सरासरीच्या दुप्पट वेगाने वाढत चालले आहे. भारतातून जाणाऱ्या विविध पर्यटकांनीही याचा अनुभव घेतला आहे. १९५० ते १९९९ या ५० वर्षांत युरोपमध्ये केवळ पाच मोठ्या उष्णतेच्या लाटा आल्या होत्या; पण २००० ते २०२५ या पाच वर्षांत २० हून अधिक लाटा आल्या. चालू वर्षी पश्र्िचम युरोपने इतिहासातील सर्वाधिक उष्ण महिन्याचा अनुभव जून महिन्यात घेतला. जागतिक स्तरावर हा महिना विक्रमी उष्णतेच्या क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर राहिला. कोपर्निकस हवामान बदल सेवा आणि जागतिक हवामान संघटनेच्या अहवालानुसार, समुद्राच्या पृष्ठभागावरील तापमानात झालेली अभूतपूर्व वाढ, अल निनोचा प्रभाव यामुळे युरोप अभूतपूर्व उष्णतेच्या विळख्यात सापडला आहे. तीव्र उष्णतेमुळे वनस्पतींमधील ओलावा नाहीसा होऊन दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होत आहे. मानवी क्रियाकलापांमुळे पृथ्वीचे तापमान वाढल्याने जंगले अधिक कोरडी होत आहेत. परिणामी जंगलांना आग लागण्याची तसेच ती वेगाने पसरण्याची शक्यता अनेक पटींनी वाढली आहे. वणव्यांच्या भक्ष्यस्थानी पडणाऱ्या जंगलाचे क्षेत्रफळही २० वर्षांपूर्वीच्या तुलनेत जवळपास दुप्पट झाले आहे. पश्र्िचम युरोपमधील दुष्काळामुळे जंगलांमधील झाडे शुष्क होऊन जणू आगीसाठी सरपण बनली आहेत. चालू महिन्यामध्ये हवामानातील कोरडेपणा दर्शवणारा निर्देशांक उच्च पातळीवर पोहोचला आहे. वाऱ्यांची भूमिकाही वणवे पसरण्यात मोठी असते. फ्रान्समधील जिरोंद येथील सर्वात मोठी आग वाऱ्यामुळेच पूर्वेकडील किनारपट्टीकडून पश्र्िचमेकडे पसरली. फ्रान्सच्या दक्षिणेकडील किनाऱ्यावर वसलेला कॅप फेरे द्वीपकल्प हा नैसर्गिक सौंदर्य, विस्तीर्ण समुद्रकिनारे आणि घनदाट जंगलांसाठी प्रसिद्ध आहे. दरवर्षी उन्हाळ्यात लाखो पर्यटक येथे सुट्ट्यांसाठी येतात. मात्र यावर्षी या परिसरातील रमणीय दृश्यांची जागा धुराच्या लोटांनी घेतली आहे. हवेत राखेचा दर्प पसरला असून अनेक भागांत सूर्यप्रकाशही धुराच्या पडद्याआड गेला आहे. आतापर्यंत ८७०० हेक्टरपेक्षा अधिक जंगल भस्मसात झाले असून ही आग वेगाने पुढे सरकत आहे. वणव्यांमुळे मोठ्या प्रमाणावर हरितगृह वायू उत्सर्जित होतात. वातावरणातील कार्बनचे प्रमाण वाढून पुन्हा जागतिक तापमानवाढीला हातभार लागतो. जळालेली जंगलं कार्बन शोषून घेण्याची नैसर्गिक क्षमता गमावतात. परिणामी हवामान बदल अधिक वेगाने घडू लागतो. म्हणजेच हे एक दुष्टचक्र बनले आहे. २०२४ हे वर्ष यादृष्टीने महाभयंकर ठरले. या एका वर्षामध्ये जगभरातील सुमारे १ कोटी ३५ लाख हेक्टर जंगल वणव्यांमुळे नष्ट झाले. पायरोक्युम्युलोनिंबस म्हणजे जंगलातील भीषण आगीमुळे तयार होणारे ढग. पूर्वी ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि अमेरिकेच्या काही भागांपुरती मर्यादित असलेली ही घटना युरोपमध्येही दिसू लागल्याने शास्त्रज्ञांची चिंता वाढली आहे. पायरोक्युम्युलोनिंबस ढगांची निर्मिती भीषण वणव्यांमुळे होते. आगीनंतर प्रचंड उष्णता निर्माण होते. त्यामुळे गरम हवा, धूर, राख आणि सूक्ष्म कण वेगाने वरच्या वातावरणात झेपावतात. वातावरणातील आर्द्रतेशी त्यांचा संयोग झाल्यानंतर उंच, घनदाट आणि वादळी ढग तयार होतात. हे ढग इतके शक्तिशाली असतात की, ते स्वतःचे स्वतंत्र हवामान तयार करू शकतात. त्यामुळे एक साधा वणवा काही तासांतच महाविनाशकारी स्वरूप धारण करू शकतो. आगीच्या ढगांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते स्वतःच आगीला अधिक भडकवतात. ढगांच्या निर्मितीमुळे निर्माण होणारे जोरदार उर्ध्वगामी आणि अधोगामी वारे सतत दिशाबदल करत राहतात. या वाऱ्यांमुळे आगीला मोठ्या प्रमाणात प्राणवायू मिळतो आणि ज्वाळा अधिक वेगाने पसरतात. उडणाऱ्या ठिणग्या अनेक किलोमीटर दूर जाऊन नवीन ठिकाणी आग लावू शकतात. परिणामी, एका ठिकाणी सुरू झालेला वणवा काही तासांतच अनेक आघाड्यांवर पसरतो. अनेक वेळा आग नियंत्रणात आणण्याऐवजी नागरिकांचे प्राण वाचविणे आणि त्यांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करणे हेच प्राधान्य ठरते. जंगलांचे नुकसान, जैवविविधतेचा ऱ्हास, वन्य जीवांचे मृत्यू, वायुप्रदूषण आणि आर्थिक नुकसान यामुळे या संकटाची व्याप्ती अधिक गंभीर बनली आहे. डेहराडून येथील फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिटट्यूट आणि आयआयटी रुरकी यांच्या अभ्यासानुसार वार्षिक सरासरी तापमानात १ अंश सेल्सिअस वाढ झाल्यास जंगलातील आगींच्या घटनांमध्ये सुमारे ११२ ने वाढ होऊ शकते. उन्हाळ्यात सरासरी तापमानात १ अंश वाढ झाल्यास हा आकडा सुमारे १२८ अतिरिक्त आगींपर्यंत जाऊ शकतो. या पार्श्र्वभूमीवर युरोपचा विचार करता पूर्व औद्योगिक काळाच्या (१८५०-१९००) तुलनेत तेथील तापमान आज २.२ ते २.३ अंश सेल्सिअसने वाढले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळातही युरोपला वणव्यांचे संकट भेडसावण्याची शक्यता आहे. हवामान बदलांचे इतके तडाखे बसूनही विकसित देश पर्यावरण रक्षणाबाबतचा दुटप्पीपणा सोडण्यास तयार नाहीत, ही मोठी शोकांतिका आहे. वस्तुतः ज्या औद्योगिक क्रांतीने युरोपला आर्थिकदृष्ट्या समृद्ध केले, तिनेच आज संपूर्ण जगासमोर अस्तित्वाचा मोठा प्रश्र्न निर्माण केला आहे. गरीब राष्ट्रांना जागतिक तापमानवाढीबाबत आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या त्यांना सोयीचे वाटत असले तरी या संकटाच्या झळांपासून त्यांचीही सुटका होणार नाही. तापमानाचा उच्चांक आणि आगीच्या भक्ष्यस्थानी पडणारी वनसंपदा या दुहेरी संकटांनंतर तरी युरोपसह पश्चिमी जग धडा घेईल का?

# मंत्रिमंडळ निर्णय (एकूण निर्णय - ८)

(ग्राम विकास व पंचायती राज)

**ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांना १२ महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागणार**

कायद्यांमध्ये सुधारणा करून अध्यादेश काढण्यास मान्यता ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या राखीव जागांवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत स्पष्ट तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२६ प्रख्यापित करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. आता या सदस्यांना १२ महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे. या निर्णयानुसार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर, मात्र या अध्यादेशाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी झालेल्या ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक अथवा पोटनिवडणुकांमध्ये राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना, निवडून आल्याचे घोषित झाल्यापासून १२ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात येणार आहे. निर्धारित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर झाल्यास संबंधित व्यक्तीची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाल्याचे मानण्यात येईल. तसेच ती व्यक्ती अनुक्रमे सदस्य, सरपंच, जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा परिषद अध्यक्ष अथवा पंचायत समिती सभापती म्हणून पदावर राहण्यास अपात्र ठरेल. यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील संबंधित कलमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्यात येणार आहेत.

--------------

(विधि व न्याय)

**एनडीपीएस खालील प्रकरणासाठी पुण्यात विशेष न्यायालय स्थापन**

मादक द्रव्ये व मादक पदार्थ अधिनियम १९८५ (   , १९८५) अंतर्गत दाखल प्रकरणे चालविण्याकरिता पुणे येथे विशेष न्यायालय स्थापन करण्यास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. उच्च न्यायालयाने पुणे येथील प्रलंबित प्रकरणांची संख्या विचारात घेता विशेष न्यायालय स्थापन करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार आज झालेल्या बैठकीत विशेष न्यायालय स्थापन करण्यास आणि त्यास आवश्यक आठ पदांना मान्यता देण्यात आली. यामध्ये जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, लघुलेखक श्रेणी-एक, सहाय्यक अधीक्षक, वरिष्ठ लिपीक अशी प्रत्येकी एक आणि कनिष्ठ लिपीक दोन अशा एकूण सहा नियमित पदे आणि दोन शिपाई पदांची भरती बाह्ययंत्रणेव्दारे करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी येणाऱ्या एक कोटी २६ लाख ३५ हजार रुपयांच्या खर्चासही मंजुरी देण्यात आली. राज्यात सध्या एनडीपीएस कायद्यानुसार सुमारे तीस हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी पुण्यात १४२५ प्रकरणे प्रलंबित आहेत. पुणे येथील न्यायालयासाठी पुणे जिल्हा न्यायालयातील कक्ष क्रमांक २२ उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

--------------

(विधि व न्याय)

**कुर्डूवाडी येथे दिवाणी न्यायालयास मान्यता**

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील कुडूवाडी येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या न्यायालयासाठी न्यायिक अधिकाऱ्याचे एक पद, सहाय्यक कर्मचाऱ्यांची ११ नियमित पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच आवश्यक कामकाजासाठी बाह्य यंत्रणेद्वारे सेवा घेण्यासही मान्यता देण्यात आली. प्रस्तावित न्यायालयासाठी एक कोटी अठरा लाख चौऱ्याहत्तर हजार रूपयांच्या खर्चासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे कुडूवाडी व परिसरातील नागरिकांना दिवाणी व फौजदारी स्वरूपाच्या प्रकरणांसाठी दूरवर जावे लागणार नाही. न्यायप्रविष्टांना स्थानिक पातळीवर जलद, सुलभ व परिणामकारक न्यायसेवा उपलब्ध होण्यास मदत होणार असून न्यायव्यवस्थेची कार्यक्षमताही अधिक बळकट होणार आहे.

--------------

(विधि व न्याय)

**कर्जत येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयास मान्यता**

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत व जामखेड तालुक्यांतील नागरिकांना न्यायसेवा अधिक सुलभ व जलद उपलब्ध करून देण्यासाठी कर्जत येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या प्रस्तावित न्यायालयासाठी न्यायिक अधिकाऱ्याचे एक पद, शासकीय अभियोक्ता कार्यालयासह सहाय्यभूत कर्मचाऱ्यांची २२ पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच आवश्यक कामकाजासाठी बाह्य यंत्रणेद्वारे सात मनुष्यबळांची सेवा घेण्यासही मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तावित न्यायालय व शासकीय अभियोक्ता कार्यालयासाठी तीन कोटी तीस लाख रूपये खर्चास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे कर्जत व जामखेड तालुक्यांतील नागरिकांना जिल्हा व सत्र न्यायालयीन कामकाजासाठी दूरवर जावे लागणार नाही. स्थानिक पातळीवर न्यायदानाची सुविधा उपलब्ध झाल्याने न्यायप्रविष्टांचा वेळ, खर्च आणि श्रम वाचतील. तसेच न्यायव्यवस्थेची कार्यक्षमता वाढून नागरिकांना अधिक वेगवान, सुलभ आणि प्रभावी न्यायसेवा मिळण्यास मदत होणार आहे.

--------------

(विधि व न्याय)

**अहिल्यानगर, परभणी, सोलापूर, नांदेडसह यवतमाळला अनन्य विशेष न्यायालये**

अनुसुचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९, सुधारीत अधिनियम, २०१५ अनुसार दाखल प्रकरणे चालविण्याकरिता अहिल्यानगर, परभणी, सोलापूर, नांदेड व यवतमाळ येथे अनन्य विशेष न्यायालये (   ) स्थापन करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील व्यक्तींना न्याय मिळवून देण्यासाठी ही न्यायालये उपयुक्त ठरणार आहेत. एका अनन्य विशेष न्यायालयाकरिता न्यायाधीशांच्या एका पदासह सहाय्यभूत कर्मचाऱ्यांची सहा अशा एकूण सात नियमित पदे आणि दोन मनुष्यबळाच्या सेवा बाह्य यंत्रणेकडून उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी येणाऱ्या चार कोटी ५१ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली. राज्यात अनुसुचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ खाली सुमारे १७,०२३ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी अहिल्यानगर येथे १०१४, परभणी येथे ५२६, सोलापूर येथे ५१६, नांदेड येथे ७३५ आणि यवतमाळ येथे ७२३ प्रकरणे प्रलंबित आहेत.

--------------

(महसूल विभाग)

**गौण खनिज अवैध उत्खनन व वाहतुकीवर अधिक कठोर कारवाई; दंडाच्या तरतुदीत वाढ**

राज्यातील गौण खनिज अवैध उत्खनन व वाहतुकीला प्रभावी आळा घालण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८(७) मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे होते. या निर्णयानुसार, गौण खनिज अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणांमध्ये स्वामित्वधनाच्या दहापट दंड आकारण्याची तरतूद करण्यात येणार आहे. या कठोर दंडात्मक तरतुदीमुळे अवैध उत्खनन आणि वाहतुकीवर अधिक प्रभावी प्रतिबंध येण्यास मदत होणार आहे. विधिमंडळाची दोन्ही सभागृहे संस्थगित असल्याने आणि या सुधारणेद्वारे दंडात्मक उत्पन्न वाढीसह कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करणारा अध्यादेश प्रख्यापित करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

--------------

(नगर विकास)

**मुंबई रेल्वे विकास महामंडळाचे समभाग भांडवल ५०० कोटींवर**

मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित कंपनीचे प्राधिकृत समभाग भांडवल २५ कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपयापर्यंत वाढविण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. मुंबई रेल्वे विकास महामंडळ लिमिटेडची स्थापना १९९९ मध्ये करण्यात आली आहे. या कंपनीत रेल्वे मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्यात अनुक्रमे ५१:४९ या प्रमाणात भागभांडवल आहे. या महामंडळाकडून मुंबई नागरी परिवहन प्रकल्पअंतर्गत उपनगरीय रेल्वे पायाभूत सुविधा विकसित करणे, क्षमता वाढविणे, सुधारणा करणे आणि प्रवाशांना आधिक दर्जेदार सुविधा देण्यासाठी पायाभूत विकास प्रकल्प राबविण्यात येतात. आता या महामंडळाकडे सोपविण्यात येणाऱ्या प्रकल्पांचा आकार वाढत असल्याने खेळत्या भांडवलात वाढ करण्यासाठी महामंडळाच्या समभाग भांडवलात वाढ करण्यात यावी, असा ठराव करण्यात आला आहे. त्यानुसार मुंबई रेल्वे विकास महामंडळाचे प्राधिकृत समभाग भांडवल २५ कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपयापर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर महामंडळामधील एकूण अधिकृत समभाग भांडवलापैकी भरणा केलेले समभाग भांडवल २५ कोटी रुपयांवरून २२५ कोटी करण्यासही मान्यता देण्यात आली. या वाढीपोटी राज्य शासनाच्या हिश्याचे ९८ कोटी रुपयांचे योगदान देण्यासही मान्यता देण्यात आली.


--------------

(कृषी विभाग)

**कृत्रिम बुद्धिमत्ता नाविन्यता केंद्रासाठी व्यवस्थापकीय संचालक पदास मान्यता**

महाॲग्री-एआय धोरणानुसार कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रिटेक नाविन्यता केंद्र कार्यालयातील व्यवस्थापकीय संचालक पदास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्य मंत्रिमंडळाने महाॲग्री-एआय धोरण जाहीर केले आहे. यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रिटेक नाविन्यता केंद्र स्थापन करण्यात आले आहे. सध्या या केंद्राच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा प्रभारी कार्यभार कृषि विभागातील उपसचिव यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. मात्र हे पद मंत्रालयातील सहसचिव किंवा उपसचिव अथवा समकक्ष दर्जाच्या शासकीय अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीव्दारे भरण्यात येणार आहे.

# गुरुपौर्णिमा : बुद्धाचा प्रकाश, बाबासाहेबांचा विचार आणि बुद्धीची वाट!




गुरुपौर्णिमा म्हटली की डोळ्यांसमोर येतो तो गुरूचा चेहरा, त्याच्या चरणी ठेवलेली श्रद्धा आणि त्याने दिलेल्या ज्ञानाबद्दल व्यक्त केली जाणारी कृतज्ञता. पण आजच्या काळात गुरुपौर्णिमेचा अर्थ केवळ गुरूंच्या चरणी नतमस्तक होण्यात नाही, तर गुरूंनी दिलेल्या विचारांच्या प्रकाशात स्वतःचे जीवन तपासण्यात आहे. गुरू तोच, जो अंधानुकरण शिकवत नाही; जो प्रश्न विचारायला शिकवतो. गुरू तोच, जो शिष्याला स्वतःच्या पायावर उभे करतो; जो आयुष्यभर स्वतःच्या चरणी डोके ठेवायला भाग पाडत नाही आणि म्हणूनच गुरुपौर्णिमेच्या या पवित्र पर्वावर तथागत गौतम बुद्ध आणि परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ दोन महामानवांना अभिवादन करणे नव्हे, तर विवेक, समता, स्वातंत्र्य आणि माणुसकीच्या विचारांना पुन्हा एकदा जागवणे होय. तथागत गौतम बुद्धांनी जगाला दिलेला सर्वात मोठा संदेश कोणता असेल, तर तो आहे स्वतः विचार करा, सत्याची चिकित्सा करा आणि जे तर्काला पटते, अनुभवाला येते आणि मानवकल्याणाला पोषक ठरते तेच स्वीकारा. बुद्धांनी माणसाला अंधश्रद्धेच्या अंधारातून प्रज्ञेच्या प्रकाशाकडे नेले. त्यांनी प्रश्न विचारणाऱ्या मनाला पापी ठरवले नाही, उलट प्रश्न विचारणे हीच ज्ञानाची सुरुवात आहे, असे जगण्याचा संदेश दिला. दुःखाचे कारण शोधताना त्यांनी स्वर्गाच्या कल्पनेपेक्षा पृथ्वीवरील माणसाच्या दुःखाकडे पाहिले. त्यांनी कर्मकांडापेक्षा करुणेला, जातिभेदापेक्षा समतेला आणि अंधश्रद्धेपेक्षा प्रज्ञेला महत्त्व दिले.

म्हणूनच बुद्ध हे केवळ धर्माचे प्रवर्तक नाहीत; ते मानवी बुद्धीला मुक्त करणारे महान गुरू आहेत. त्यांनी माणसाला सांगितले की, कोणतीही गोष्ट केवळ परंपरा आहे म्हणून स्वीकारू नका. कोणी सांगितली म्हणून सत्य मानू नका. स्वतः तपासा, स्वतः विचार करा आणि मग निर्णय घ्या. आजच्या माहितीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात हा बुद्धांचा संदेश अधिकच महत्त्वाचा आहे. कारण आज अज्ञानाचा अभाव नाही, पण विवेकाचा अभाव आहे. माहितीच्या महासागरात सत्य शोधण्याची क्षमता हरवत चालली आहे. सोशल मीडियावरील प्रत्येक संदेश खरा मानला जातो आणि अफवांना तथ्याचे रूप दिले जाते. अशा काळात बुद्धांचा 'प्रज्ञेचा मार्ग' समाजाला वाचवू शकतो. याच बुद्धांच्या विचारांचा आधुनिक भारताच्या सामाजिक आणि घटनात्मक जीवनाशी सशक्त संबंध जोडणारे महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. बाबासाहेबांनी बुद्धांना केवळ गुरू मानले नाही, तर त्यांच्या विचारांना आधुनिक सामाजिक परिवर्तनाचे शस्त्र बनवले. हजारो वर्षांच्या जातिव्यवस्थेने माणसाला माणसापासून तोडले होते. जन्मावर आधारित श्रेष्ठ-कनिष्ठतेने समाजाची मने गुलाम केली होती. अशा परिस्थितीत बाबासाहेबांनी शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा मार्ग दाखवला. त्यांनी सांगितले की, माणसाची किंमत त्याच्या जन्माने नाही, तर त्याच्या कर्तृत्वाने ठरली पाहिजे.

बाबासाहेबांच्या जीवनात गुरूची संकल्पना ही व्यक्तिपूजेपेक्षा विचारपूजेशी जोडलेली होती. त्यांनी ज्ञानाला मुक्तीचे साधन मानले, म्हणूनच त्यांचा संदेश होता शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. हा केवळ घोषवाक्य नव्हता तर तो गुलाम मानसिकतेविरुद्धचा क्रांतिकारी मंत्र होता. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नसून स्वतःच्या गुलामीची जाणीव करून घेण्याचे आणि ती गुलामी मोडून काढण्याचे सामर्थ्य आहे, हे बाबासाहेबांनी दाखवून दिले. गुरुपौर्णिमेच्या दिवशी बाबासाहेबांना अभिवादन करताना आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे, आपण बाबासाहेबांच्या प्रतिमेची पूजा करतो आहोत की त्यांच्या विचारांची? त्यांच्या पुतळ्याला हार घालणे सोपे आहे, पण त्यांच्या संविधानिक मूल्यांचे रक्षण करणे कठीण आहे. त्यांच्या नावाने घोषणा देणे सोपे आहे, पण जातीय भेदभावाला आपल्या घरापासून आणि मनापासून हद्दपार करणे कठीण आहे. बाबासाहेबांचे नाव घेणे सोपे आहे, पण वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे, प्रश्न विचारणे आणि अन्यायाविरुद्ध उभे राहणे कठीण आहे.

बुद्ध आणि बाबासाहेबांच्या विचारांची खरी गुरुदक्षिणा हीच आहे की, आपण आपल्या बुद्धीला गुलाम होऊ देऊ नये. आज समाजात अंधश्रद्धा, कर्मकांड, बुवाबाजी आणि चमत्कारांच्या नावाखाली सामान्य माणसाची फसवणूक केली जाते. कुणी ग्रह-नक्षत्रांच्या भीतीने माणसाचे भविष्य ठरवतो, कुणी चमत्कारांच्या नावाने श्रद्धेचा व्यापार करतो, तर कुणी धर्माच्या नावावर माणसामाणसात भिंती उभ्या करतो. या सर्वांवर बुद्धीचा प्रकाश टाकणे ही आजची खरी गरज आहे. बुद्धीसम म्हणजे केवळ बुद्धीचा अभिमान नव्हे, तर बुद्धीचा समाजहितासाठी जबाबदार वापर होय. विवेकवाद म्हणजे परंपरेचा अपमान नव्हे, तर परंपरेतील चांगले-वाईट तपासण्याची क्षमता होय. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे धर्मद्वेष नव्हे, तर अंधानुकरणाला नकार देऊन सत्याचा शोध घेण्याची वृत्ती होय. बुद्धी ही माणसाला माणूस बनवणारी शक्ती आहे. पण ती बुद्धी जर करुणेशिवाय असेल, तर ती विनाश घडवू शकते. म्हणून बुद्धांचा प्रज्ञेचा विचार आणि बाबासाहेबांचा सामाजिक न्यायाचा विचार यांची सांगड घालणे ही आजच्या भारताची खरी गरज आहे.

आज आपण गुरुपौर्णिमा साजरी करतो, पण आपल्या समाजात गुरूंचे विचार किती जिवंत आहेत? विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यापासून रोखले जाते, संशय व्यक्त करणाऱ्याला धर्मद्रोही ठरवले जाते, वैज्ञानिक दृष्टिकोन मांडणाऱ्याची खिल्ली उडवली जाते आणि अंधश्रद्धेला विरोध करणाऱ्यांना शत्रू मानले जाते. ही परिस्थिती बदलायची असेल तर शाळांपासून घरापर्यंत आणि समाजापासून राजकारणापर्यंत विवेकाचे शिक्षण द्यावे लागेल. गुरू म्हणजे शिष्याला स्वतःच्या विचारांची कैद करून ठेवणारा नव्हे, तर त्याला स्वतंत्र विचार करण्याची ताकद देणारा. बुद्धांनी माणसाला स्वतःच्या प्रकाशाचा शोध घ्यायला शिकवले. बाबासाहेबांनी शिक्षणाच्या माध्यमातून वंचितांना आत्मभान दिले. या दोन्ही महामानवांच्या विचारांचा केंद्रबिंदू एकच होता. माणसाला मुक्त करा! अज्ञानातून मुक्त करा, भीतीतून मुक्त करा, जातिभेदातून मुक्त करा, अंधश्रद्धेतून मुक्त करा आणि मानसिक गुलामगिरीतून मुक्त करा. आजच्या गुरुपौर्णिमेला म्हणूनच आपल्याला एका नव्या गुरुदक्षिणेची गरज आहे. ती गुरुदक्षिणा म्हणजे बुद्धाचा विवेक आपल्या विचारांत आणणे, बाबासाहेबांचा समतेचा विचार आपल्या आचरणात आणणे आणि बुद्धीला अंधश्रद्धेपेक्षा मोठे स्थान देणे. जात, धर्म, पंथ, भाषा आणि आर्थिक विषमता यांच्या पलीकडे जाऊन प्रत्येक माणसाला माणूस म्हणून सन्मान देणे. संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाच्या मूल्यांचे संरक्षण करणे. हीच बुद्धाला खरी वंदना आणि बाबासाहेबांना खरी आदरांजली ठरेल.

गुरुपौर्णिमा ही केवळ गुरूंच्या चरणी माथा टेकण्याची परंपरा राहू नये. ती आपल्या विवेकाला जागवण्याची चळवळ बनली पाहिजे. कारण ज्या समाजात प्रश्न विचारणारे नागरिक असतात, तिथे लोकशाही जिवंत राहते. ज्या समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन असतो, तिथे अंधश्रद्धेला थारा मिळत नाही. ज्या समाजात समता असते, तिथे माणूस माणसाचा शत्रू होत नाही. आणि ज्या समाजात बुद्धाचा करुणामय विवेक आणि बाबासाहेबांचा समतावादी विचार जिवंत असतो, तो समाज खऱ्या अर्थाने प्रगतिशील होतो. आज गुरुपौर्णिमेच्या दिवशी तथागत गौतम बुद्धांच्या प्रज्ञेला, करुणेला आणि मानवतावादी विचारांना विनम्र अभिवादन करूया. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्ञानक्रांतीला आणि सामाजिक न्यायाच्या संघर्षाला नमन करूया. पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा केवळ जयघोषात न ठेवता आपल्या जीवनात उतरवण्याची प्रतिज्ञा करूया. बुद्धाचा प्रकाश आपल्या विचारांना दिशा देवो, बाबासाहेबांचा विचार आपल्या संघर्षाला शक्ती देवो आणि बुद्धीचा विवेक आपल्या समाजाला अंधश्रद्धेच्या अंधारातून बाहेर काढो!

गुरूंच्या चरणी फुले अर्पण करण्यापेक्षा त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालणे मोठे आहे. बुद्धांना वंदन करण्यापेक्षा त्यांच्या प्रज्ञेचा स्वीकार करणे मोठे आहे. बाबासाहेबांना अभिवादन करण्यापेक्षा त्यांच्या संविधानिक मूल्यांचे रक्षण करणे मोठे आहे. हीच खरी गुरुदक्षिणा! हीच खरी गुरुपौर्णिमा! आणि हाच खऱ्या अर्थाने बुद्धीसमाजाचा मार्ग! गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त आपल्या जीवनाला प्रज्ञा, विवेक, समता आणि माणुसकीची दिशा देणाऱ्या तथागत गौतम बुद्धांना आणि परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कोटी कोटी नमन! आपणास व आपल्या परिवारास गुरुपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

**प्रविण बागडे**
नागपूर/मो. ९९२३६२०९१९

# परिवर्तनवादी साहित्य संमेलनाचे उद्घाटक पालकमंत्री संजय शिरसाठ; स्वागताध्यक्षपदी उद्योजक ॲड. रामेश्वर तायडे

## दुसऱ्या नियोजन बैठकीत एकमताने महत्वपूर्ण निर्णय

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** पहिल्या राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी रविवारी दि. २६ जुलै सुभेदारी गेस्ट हाऊस येथे दुसरी नियोजन बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. प्रा. शिवाजी वाठोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांची संमेलनाचे उद्घाटक म्हणून, तर ज्येष्ठ उद्योजक ॲड. रामेश्वर तायडे यांची स्वागताध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात या निवडीचे स्वागत केले.

बैठकीची सुरुवात शाहीर उत्तमराव म्हस्के आणि कवी अनिल वानखेडे यांच्या परिवर्तनवादी कवितांनी झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते संमेलनाच्या अधिकृत बोधचिन्हाचे प्रकाशन करण्यात आले.

संमेलनाचे मुख्य संयोजक तथा निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष रतनकुमार साळवे यांनी संमेलनाची उद्दिष्टे, स्वरूप आणि पुढील नियोजन यांचा सविस्तर आढावा घेतला. परिवर्तनवादी साहित्य चळवळीला अधिक व्यापक करण्यासाठी राज्यभरातील साहित्यिक, लेखक, कवी, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन हे संमेलन यशस्वी करावे,





असे आवाहन त्यांनी केले.

स्वागताध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर बोलताना ॲड. रामेश्वर तायडे म्हणाले, ''हे राज्यस्तरीय साहित्य संमेलन असल्यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील साहित्यिकांचा सहभाग असला पाहिजे. बुद्ध तत्त्वज्ञानाने प्रेरित परिवर्तनवादी विचारांचे साहित्यिक या विचारपीठावर यावेत. संमेलनाच्या प्रत्येक टप्प्यात पारदर्शकता राखून सर्वसमावेशक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. या संमेलनाला कोणतेही गालबोट लागू नये, यासाठी सर्वांनी जबाबदारीने काम करावे. हे संमेलन राज्यातील परिवर्तनवादी साहित्य चळवळीचा आदर्श ठरेल, असा मला विश्वास आहे.

यावेळी ज्येष्ठ विचारवंत भीमराव सरोदे यांनी परिवर्तनवादी साहित्याची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, ''परिवर्तनवादी साहित्य हे केवळ शहरापुरते मर्यादित न राहता ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे. नवोदित साहित्यिक, कवी आणि लेखकांना विचारपीठ मिळावे, यासाठी लहान-मोठी साहित्य संमेलने सातत्याने आयोजित होणे ही काळाची गरज आहे. सामाजिक परिवर्तनासाठी साहित्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

अध्यक्षीय समारोपात प्रा. शिवाजी वाठोरे म्हणाले, ''हे संमेलन सर्वसमावेशक असेल. येथे आलेला प्रत्येक व्यक्ती परिवर्तनवादी विचार घेऊन जाईल. संमेलनाच्या आयोजनात कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. एकमताने आणि समन्वयाने काम केल्यास हे संमेलन निश्चितच यशस्वी होईल.

यावेळी ॲड. डी. व्ही. खिल्लारे, डॉ. धनराज गोंडाणे, राहुल साळवे, इंजि. राजधर दांडगे, महादेव डांबरे, अंबादास रगडे, एकनाथ त्रिभुवन, शैलेंद्र मिसाळ, डॉ. मधुकर दिवेकर, बाबुराव बनसोडे आणि ग. ह. राठोड यांनीही संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी मार्गदर्शक सूचना मांडल्या. बैठकीत परिवर्तनवादी साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी इंजि. राजधर दांडगे यांनी पुढाकार घेत ₹२५,००० रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणा केली. त्यांच्या या उदार योगदानाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. त्यांच्या या घोषणेमुळे संमेलनाच्या आयोजनाला आर्थिक बळ मिळणार असून, इतरांनीही अशाच प्रकारे सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

त्यानंतर कॉकरोच जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी उभारलेल्या संघर्षाबद्दल तसेच शिक्षणतज्ज्ञ आणि पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी शिक्षण, पर्यावरण आणि जनहिताच्या प्रश्नांसाठी केलेल्या लढ्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. हा अभिनंदनाचा ठराव ॲड. डी. व्ही. खिल्लारे यांनी मांडला. उपस्थित सर्व साहित्यिक, विचारवंत, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात या प्रस्तावाला अनुमोदन देत अभिजीत दिपके आणि सोनम वांगचुक यांचे अभिनंदन केले.

बैठकीत संमेलनाची तारीख, स्थळ, विविध समित्यांची स्थापना, त्यांच्या जबाबदाऱ्या तसेच राज्यभर जनसंपर्क मोहीम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. वैचारिकदृष्ट्या समृद्ध, शिस्तबद्ध आणि सर्वसमावेशक संमेलन घडविण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. या बैठकीस भीमराव गाडेकर, राहुल साळवे, सपकाळ, व्ही. बी. सपकाळ, विजय कांबळे, ग. ह. राठोड, महादेव डांबरे, रामदास कहाळे, बाबुराव बनसोडे, भीमराव सरोदे, राहुल मेश्राम, डॉ. धनराज गोंडाणे, प्रा. शिवाजी वाठोरे, ॲड. रामेश्वर तायडे, शाहीर उत्तमराव म्हस्के, अनिल वानखेडे, गौतम घाटसरे, डॉ. मधुकर दिवेकर, इंजि. राजधर दांडगे, अंबादास रगडे, एकनाथ त्रिभुवन, एम. एस. सुरडकर, एम. बी. घोरपडे, अजय बोर्डे आणि रमेश बी. वानखेडे यांच्यासह अनेक साहित्यिक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीचे सूत्रसंचालन भीमराव गाडेकर यांनी केले, तर डॉ. मधुकर दिवेकर यांनी आभार मानले. आगामी पहिल्या राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलन राज्यातील परिवर्तनवादी साहित्य चळवळीच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी पर्व ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त करत संमेलन यशस्वी करण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार केला.

# वर्षावास प्रारंभ आषाढ पौर्णिमा (गुरुपौर्णिमा)



बौध्द धम्मामध्ये आषाढ पौर्णिमेला विशेष महत्व आहे. कारण या दिवशी भगवंताच्या जिवनातील अनेक घटना याच दिवशी घडल्या आहे.त्यापैकी पहिली घटना म्हणजे महामायेला गर्भधारणा झाली.दूसरी घटना म्हणजे भगवंतानी सारनाथ या ठिकाणी पहिले धम्मचक्र प्रवर्तन करून आपल्या पाच शिष्याना प्रथम धम्मोपदेश दिला.त्यामुळे या शिष्यानी भगवंताला आपले गुरु मानले.म्हणून ही पौर्णिमा गुरुपौर्णिमा म्हणून ओळखली जाते.तिसरी घटना म्हणजेच याच दिवशी भिक्खू संघाची स्थापना झाली.अश्या अनेक महत्वपूर्ण घटना संयोगाने याच दिवशी घडल्या आहे.

तसेच वर्षावास परंपरेला देखील धम्मामध्ये अतिशय महत्व असून ही बुध्दकाळापासून चालत आलेली परंपरा आहे.याचे महत्व स्वतः तथागत भगवान बुध्द यांनी अनेक ठिकाणी वर्षावास करून पुजनीय भिक्खू संघ व श्रद्धावान उपासकांच्या समोर आदर्श ठेवले आहे.या दिवशी आषाढ पौर्णिमेला जगभरातील पुजनीय भिक्खू संघाकडून वर्षावासाचा प्रारंभ करण्यात येतो.ह्या वर्षावासाचा कालावधी हा आषाढ ते आश्विन असा तिन महिन्याचा असतो.त्यामुळे तिन महिने सर्वत्र प्रत्येक बुध्दविहारात विपश्यना (ध्यानसाधना) त्रिरत्न वंदना,परित्राणपाठ,धम्मदेसना,बुध्द आणि त्यांचा धम्म या महान ग्रंथाचे वाचन,उपोसथ आदी.कृतिकार्यक्रम सुरु करण्यात येतात.त्यामुळे आपण देखील या तिन महिन्यामध्ये शक्य होईल तेव्हा सहपरिवार बुद्धविहारात अथवा बुद्ध लेणी वर जावून या कृति कार्यक्रमा मध्ये प्रत्यक्ष आवर्जून सहभागी व्हावे.व इतरांना देखील सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे. तसेच स्वतःच्या घरी देखील आपल्याला तिन महिन्यात धम्म आचरण करून हे सुख मिळविता येईल त्यासाठी खालील सम्यक संकल्प यांना प्रत्यक्ष कृतिची जोड देणे आवश्यक आहे.

दररोज शक्य असेल तितके बुध्द आणि त्यांचा धम्म धम्म ग्रंथाचे श्रद्धापूर्वक वाचन करावे. चर्चा कराव्या.चिंतन करावे.किंवा ऑडियो स्वरूपात श्रवण करावे.वर्षा वासा दरम्यान पुजनीय भिक्खू संघाला भोजनदान करावे. त्यासाठी घरी किंवा आपल्या गावातील बुध्द विहारात भोजनदानासाठी आमंत्रित करून पुण्य अर्जित करावे.त्यादिवशी घरी सामूहिक ध्यानसाधना,परित्राणपाठ व धम्मदेसना आयोजित करून आपल्या नातेवाईकांना व मित्र परिवार व शेजारी सर्वांना धम्म श्रवण करण्यासाठी निमंत्रित करावे.

वर्षावासा दरम्यान भोजनदाना व्यतिरिक्त भिक्खूना चिवरदान,औषधी,प्रवासख़र्च तसेच धम्मकार्य करण्यासाठी आवश्यक असलेली साधने दान स्वरूपात द्यावी.किंवा जिथे भिक्खू नसतील आपन वर्षावास कालावधीत भिक्खूला आमंत्रित करुन,चिवर,भोजन प्रवास खर्च दान देऊन घरी धम्मदेशना वंदना कारेक्रम आयोजित करु शकता.उपासक उपासिकांनो. वर्षावास हा जरी पुजनीय भिक्खू संघाचा असला तरीदेखील उपासकांच्या बाबतीत सुद्धा तो तितकाच महत्वाचा आहे.कारण प्रत्येकाचे धम्मआचरण सुधारण्यासाठी व पुण्यअर्जित करण्यासाठी ही संधी आहे.त्यामुळे वर्षातील हे तिन महीने धम्माच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण आहे. वर्षावासाचे महत्व लक्षात घेवून सर्वांनी या तिन महिन्यामध्ये धम्म चर्चा,धम्म श्रवण,धम्म आचरण करून वर्षावास निमित्त ठिकाणी ठिकाणी कार्यक्रम आयोजन करून ते यशस्वी करण्यासाठी प्रत्येकाने तन मन धनाने सहकार्य करावे.सर्वांना वर्षावासासाठी मनःपूर्वक मंगल कामना.. सर्वांचे मंगल हो..

**आयु.सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९, धम्म उपासक,**
**धम्म अभ्यासक, प्रचारक.भांडुप,मुंबई.**

oooooooooooooooooooooo

# सात बांगलादेशी तृतीयपंथींना मुंबईतून अटक, अवैधरीत्या भारतात प्रवेश करुन चालवत होते सेक्स रॅकेट, एमआयडीसी पोलिसांची मोठी कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईच्या अंधेरी पूर्वेत एमआयडीसी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. बांगलादेशी नागरिकांविरोधात ही कारवाई करण्यात आली आहे. भारतात अवैधरीत्या दाखल होऊन मुंबई शहरात राहणारे सात बांगलादेशी तृतीयपंथींना अटक करण्यात आली आहे. एमआयडीसी पोलिसांचा एटीसी पथकाने ही कारवाई केली आहे. घोडबंदर रोडवर फाउंटन हॉटेल परिसरात सापळा रचून सात तृतीयपंथींना अटक केली आहे.

हे सर्व तृतीयपंथी बांगलादेशी असून अवैधरित्या भारतात दाखल होऊन मुंबई शहरात सेक्स रॅकेट चालवत होते. या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांचा एटीसी पथकाला यांच्या बद्दल गुप्त माहिती मिळाली होती. यानंतर एमआयडीसीचे एटीसी पथकाने घोडबंदर रोडवर फाउंटन हॉटेल परिसरात दोन दिवस पाळत ठेवून या आरोपींना हॉटेल मधून अटक केली आहे.

अटक आरोपी तृतीयपंथी चे नाव मो.जिहाद मो. मोहम्मिल अली,वय २२ वर्षे,पिहू इस्लाम अशीर उद्दीन वय २३ वर्षे,मो. हमीदूर मो. बेलाल रहमान वय १८ वर्षे.मो. जाहेदुल हक मो. शुकूर अली वय २३ वर्षे.मो. जॉनी बाबू मो. शाहिदूल इस्लाम वय १८ वर्षे,आकी मो. नागरअली मोनी वय २१ वर्षे,मो. मुशरफ फैदुश खान, वय २२ वर्षे आहे.

एमआयडीसी पोलिसांच्या तपासात अटक आरोपीच्या मोबाईलमध्ये बांगलादेशी क्रमांक व मेसेंजर संपर्क केल्याचे दिसून आले आहे. ते बांगलादेशी नागरिक असल्याचे निष्पन्न झाले असून या आरोपींकडून एमआयडीसी पोलिसांनी मोठ्या प्रमाणात बांगलादेशी पुरावा सुद्धा जप्त केला आहे. या तृतीयपंथींच्या टोळीमध्ये मुंबई शहरात आणखी मोठ्या संख्यांमध्ये बांगलादेशी तृतीयपंथी दाखल झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. यासंदर्भात एम आयडीसी पोलिसांकडून अधिक तपास सुरु आहे.

# फेसबुकला ती चूक महागात पडली!

## मोदींचा व्हिडिओ हटवल्याने 'मेटा'ने मागितली माफी

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून फेसबुकवर शेअर केलेला बहुचर्चित 'सेल्फी व्हिडिओ' काही काळासाठी अचानक हटवण्यात आल्याने मोठा वाद निर्माण झाला. सोशल मीडियावर याबाबत तीव्र प्रतिक्रिया उमटल्यानंतर 'मेटा'ने ही तांत्रिक चूक असल्याचे मान्य करत व्हिडिओ पुन्हा पूर्ववत केला आणि अधिकृतपणे माफीही मागितली. मेटाच्या प्रवक्त्यांनी दिलेल्या निवेदनात, हा व्हिडिओ चुकून हटवण्यात आला होता. तांत्रिक अडचणीमुळे ही घटना घडली असून आता तो पुन्हा उपलब्ध करून देण्यात आला आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, या प्रकरणाची केंद्र सरकारने गंभीर दखल घेतली असून संपूर्ण घटनेची चौकशी सुरू करण्यात आली आहे. व्हिडिओ तात्पुरता हटवण्यामागील कारण स्पष्ट करण्यासाठी मेटाच्या अधिकाऱ्यांना समन्स बजावण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तसेच, माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयाने मेटा आणि इन्स्टाग्रामच्या जागतिक अधिकाऱ्यांनाही स्पष्टीकरणासाठी पाचारण केले आहे.

विद्यार्थ्यांशी संवाद साधणारा व्हिडिओ : पंतप्रधान मोदी यांनी हा सेल्फी व्हिडिओ गुरुवारी मध्यरात्रीनंतर सोशल मीडियावर पोस्ट केला होता. विशेषतः सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या जेन-झी तरुणांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने हा व्हिडिओ तयार करण्यात आला होता. फ ेसबुकसह मेटाच्या विविध प्लॅटफॉर्मवर तो शेअर करण्यात आला होता. या व्हिडिओमध्ये प्रश्नपत्रिका फुटीच्या पार्श्वभूमीवर देशभरात सुरू असलेल्या आंदोलनांदरम्यान विद्यार्थ्यांशी संवाद साधत मोदी यांनी संयम आणि शांतता राखण्याचे आवाहन केले होते.

पुढे त्यांनी मेटाला थेट सवाल करत विचारले, ''कोट्यवधी भारतीयांनी काय पाहावे आणि काय पाहू नये, हे ठरवण्याचा अधिकार मेटाला कोणी दिला? हा केवळ कंटेंट मॉडरेशनचा विषय नाही, तर पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि संभाव्य राजकीय पूर्वग्रह यासंदर्भात गंभीर प्रश्न उपस्थित करणारा प्रकार आहे.''

दरम्यान, मेटाने चूक मान्य करत व्हिडिओ पूर्ववत केला असला तरी, या प्रकरणावर केंद्र सरकारची चौकशी सुरू असून त्यातून पुढे कोणते निष्कर्ष समोर येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# धक्कादायक! भिलाडजवळ विरार-भरुच ट्रेनची चार चाके रुळावरुन घसरली आणि ...

**अहमदाबाद :** गुजरातमधील वलसाड जिल्ह्यात मंगळवारी सकाळी मोठी दुर्घटना टळली. उमरगाम तालुक्यातील भिलाड रेल्वे स्टेशनजवळ विरारहून भरूचकडे जाणाऱ्या श्एश्ळ ट्रेनची चार चाके अचानक रुळावरून घसरली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रेन क्रमांक १९१०१ विरार-भरूच भिलाड रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर येत असताना सकाळी सुमारे ६ वाजून २७ मिनिटांनी हा प्रकार घडला. ट्रेनच्या पुढील बाजूच्या ॠणब कोचची चार चाके रुळावरून घसरली. हा ॠणब कोच म्हणजे चालक ज्या डब्यातून ट्रेन चालवतो तो भाग असून तो इंजिनप्रमाणे कार्य करतो.

घटना घडताच स्टेशन परिसरात एकच गोंधळ उडाला. अचानक ट्रेनचा डबा रुळावरून घसरल्याने प्रवाशांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, रेल्वे कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल विभागातील अधिकारी, तांत्रिक पथक आणि बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. वलसाड येथून अपघात निवारण पथक आणि वैद्यकीय मदत पथकही रवाना करण्यात आले.रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या दुर्घटनेत कोणताही प्रवासी किंवा रेल्वे कर्मचारी जखमी झालेला नाही. सध्या रुळावरून घसरलेली चाके पुन्हा रुळावर आणण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

# कालकथित : बबन कांबळे (बौद्धाचार्य) यांची शोक सभा डॉ. भीमराव य. आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न






**नवी मुंबई / के. एच. हनवते :** भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई महिला जिल्हाध्यक्ष : आयुनी. शोभाताई कांबळे यांचे पती दिवंगत : बबन कांबळे गुरुजी (बौद्धाचार्य) यांचे ९ जुलै २०२६ रोजी वयाच्या ७२ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांचा पुण्यानुमोदन कार्यक्रम त्यांचे राहते गाव किणी येथे पार पडला, परंतु आयु. शोभाताई बबन कांबळे यांचे कार्यक्षेत्र हे नवी मुंबई जिल्हा असल्यामुळे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने कालकथित : बबन कांबळे यांच्या जिवन कार्यावर व त्यांनी केलेल्या कुशल कार्यावर प्रकाश टाकण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने अभिवादन सभा (श्रध्दांजली कार्यक्रम) दिनांक २६ जुलै २०२६ रोजी बुद्ध प्रतिष्ठान सेक्टर १५ वाशी नवी मुंबई येथे घेण्यात आला. सदर कार्यक्रमास व शोक सभेला संबोधित करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष व समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष : डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर साहेब यांनी आवर्जुन उपस्थित राहून बौद्धाचार्य कालकथित : बबन कांबळे गुरुजी यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

सदर कार्यक्रमात डॉ. अनंत हर्षवर्धन (अध्यक्ष - बुद्धप्रतिष्ठान वाशी) यांनी अभिवादनपर आपले विचार व्यक्त करून श्रद्धांजली वाहीली. भारतीय बौद्ध महासभेचे खालील पदाधिकारी व तसेच विविध मान्यवरांनी कार्यक्रम स्थळी उपस्थित राहून शब्दसमनाने भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आयु. रागिणीताई पवार (महिला उपविभाग प्रमुख, केंद्रीय विभाग ), आयु. स्वातीताई शिंदे ( अध्यक्षा - महाराष्ट्र राज्य महिला शाखा ), सुजाताताई कांबळे ( सरचिटणीस - महाराष्ट्र राज्य महिला शाखा ), आयुष्यमान : विजय झनके गुरुजी (नवी मुंबई जिल्हाध्यक्ष ) तसेच अनेक हितचिंतक धम्म बंधु आणि धम्म भगिणी यांनी कालकथित: बबन कांबळे गुरुजी यांनी त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी केलेले कार्य हे वाखण्याजोगे आहे अशा आदर्श व्यक्तिमत्त्वाला नवी मुंबई जिल्हयाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करून त्यांनी केलेल्या चांगल्या कामाच्या आठवणीला उजाळा दिला, सदर कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी शब्दसुमनाने भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली, आयु. स्वातीताई गायकवाड, ( उपाध्यक्षा-संस्कार, महाराष्ट्र राज्य महिला शाखा ), छायाताई दिवे ( कोषाध्यक्षा, नवी मुंबई महिला जिल्हा शाखा ), आयुष्यमान. संजय झनके गुरुजी (सरचिटणीस, नवी मुंबई जिल्हा शाखा ), प्रकाश माने गुरुजी (कोषाध्यक्ष, नवी मुंबई जिल्हा शाखा ), वंदनाताई कुरणे ( उपाध्यक्षा-संस्कार, नवी मुंबई महिला जिल्हा शाखा ), अनिताताई अहिरे ( उपाध्यक्षा - पर्यटन, नवी मुंबई महिला जिल्हा शाखा), सुनिताताई हराळ सचिव - संस्कार नवी मुंबई जिल्हा महिला शाखा ), प्राचीताई जाधव ( सचिव - संस्कार, नवी मुंबई महिला जिल्हा शाखा), प्रकाश भालेराव ( उपाध्यक्ष - संस्कार, नवी मुंबई जिल्हा ), राजेश्रीताई पारधे ( पर्यटन सचिव नवी मुंबई जिल्हा ), अजय माळवे (सचिव - संरक्षण ), दिपक कांबळे (सचिव - संरक्षण ), मंगलताई सुर्वे (उपाध्यक्ष - संरक्षण ), दत्तात्रेय भालेराव ( पर्यटन सचिव नवी मुंबई जिल्हा ), दत्तात्रय हराळ (कार्यालयीन सचिव नवी मुंबई जिल्हा ), कविता ताई कांबळे (संघटक ), सुरेखाताई सावंत ( संघटक ), मायाताई मनवर (संघटक ), व्दारकाताई माघाडे (संघटक ), विमलताई डोंगरे (संघटक ), अयोध्याताई काशिद (संघटक ), सुनंदा ताई गायकवाड, उमाताई बोरसुरे, मधुकर साळवे (सरचिटणीस - बुद्ध प्रतिष्ठाण ), सिद्धार्थ शिरसाळे ( अध्यक्ष,जेतवन बुद्ध विहार, ऐरोली ), अलकाताई आढाव (अध्यक्षा - जुईनगर शाखा), पांडुरंग भालेराव, जिवन वाडते गुरुजी (अध्यक्ष - सिवुडस शाखा ), आनंदबोधी निकाळजे (जिल्हा संघटक ), प्रमिलाताई जाधव, जिजाबाई हाबाडे, कल्याणराव हणवते (बौध्दाचार्य - पत्रकार), सागरदर्शन सोसायटी नेरुळचे पदाधिकारी, हिंदुस्थान पेट्रोलियमचे काही बांधव उपस्थित होते. तेव्हा नवी मुंबई जिल्ह्यातील महिला व पुरुष शाखेचे भारतीय बौद्ध महासभेचे शेकडो पदाधिकारी कार्यकर्ते व बुद्ध प्रतिष्ठानचे पदाधिकारी, पदाधिकारी व कार्यकर्ते या सर्वांनी वेळेवर उपस्थित राहून का. बबन कांबळे गुरुजी यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहिली, आपली धम्मभगिणी तद्वतच भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हाध्यक्षा शोकाकुल : शोभाताई कांबळे व त्यांची कन्या अपुर्वा बबन कांबळे, प्रमोद कांबळे, समाधान कांबळे, किशोर कांबळे इत्यादी कांबळे परिवाराचे सांत्वन केले. या सर्व कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व विधीवत बुद्ध वंदना आयु. संजय झनके गुरुजी ( सरचिटणीस - नवी मुंबई जिल्हा ) यांनी केले, सरते शेवटी सरणत्तय गाथा घेवुन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## NEET प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाईची मागणी; आरसीसी क्लासेस बंद करून मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी



**लातूर/प्रतिनिधी :** NEET पेपरफुटी प्रकरणातील प्रमुख आरोपी असल्याचा आरोप असलेल्या मोटेगावकर यांच्या आरसीसी क्लासेसवर तात्काळ बंदी घालून त्यांच्यासह संबंधित आरोपींवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सतीश राजेंद्र करंडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, NEET पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरात संतापाची लाट उसळली असून अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व मानसिक नुकसान झाले आहे. या प्रकरणामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असून लातूरच्या नावाजलेल्या लातूर पॅटर्नलाही मोठा धक्का बसला आहे.

करंडे यांनी आरोप केला आहे की, या प्रकरणातील प्रमुख आरोपींमध्ये मोटेगावकर, कुलकर्णी आणि डॉ. शिरोरे यांचा समावेश असून, त्यांनी आर्थिक स्वार्थासाठी विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलले. त्यामुळे आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, आरसीसी क्लासेस तात्काळ बंद करण्यात यावेत, विद्यार्थ्यांनी भरलेली फी परत करण्यात यावी तसेच डॉ. शिरोरे यांचे रुग्णालयही सील करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

यासोबतच, प्रशासनाने पुढील आठ दिवसांत ठोस कारवाई न केल्यास लोकशाही मार्गाने उपोषण आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, लातूरचे पोलीस अधीक्षक आणि शिक्षणाधिकारी यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

## भांडेवाडी येथील अत्याधुनिक घाऊक व किरकोळ मासळी बाजाराचे काम डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करावे- मत्स्यव्यवसाय मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील मौजे भांडेवाडी येथे उभारण्यात येत असलेल्या अत्याधुनिक घाऊक व किरकोळ मासळी बाजाराच्या बांधकामाला गती मिळाली असून प्रकल्पाची सुमारे ३० टक्के भौतिक प्रगती पूर्ण झाली आहे. या प्रकल्पामुळे विदर्भातील मत्स्यव्यवसायाला चालना मिळण्याबरोबरच मच्छी विक्रेत्यांना आधुनिक सुविधा उपलब्ध होणार असून या प्रकल्पाचे काम डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.

मंत्रालय मध्ये भांडेवाडी, नागपूर येथे अत्याधुनिक घाऊक व किरकोळ मासळी बाजाराच्या कामासंदर्भात आढावा बैठक झाली, त्यावेळी मंत्री राणे बोलत होते.यावेळी मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन, आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, नागपूर महानगरपालिका आयुक्त ( दूरदृष्य प्रणालीद्वारे) आणि विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री नितेश राणे म्हणाले, ''प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत राज्यात मत्स्यव्यवसायासाठी आधुनिक व दर्जेदार पायाभूत सुविधा उभारण्यावर शासनाचा भर आहे. भांडेवाडी येथील घाऊक व किरकोळ मासळी बाजारामुळे विदर्भातील मत्स्यव्यवसायाला नवे बळ मिळेल. मच्छीमार, व्यापारी आणि ग्राहकांना स्वच्छ, सुरक्षित व आधुनिक बाजारपेठ उपलब्ध होईल. हा प्रकल्प गुणवत्तापूर्ण आणि नियोजित मुदतीत पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.''

हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मासळीची साठवणूक, विक्री, वाहतूक आणि वितरण व्यवस्था अधिक सक्षम होणार असून मत्स्यव्यवसायाशी संबंधित हजारो लाभार्थ्यांना त्याचा थेट फायदा होईल. आधुनिक सुविधा, स्वच्छता आणि सुयोग्य बाजार व्यवस्थापनामुळे नागपूरसह संपूर्ण विदर्भातील मत्स्य व्यवसायाच्या विकासाला नवी दिशा मिळेल.

## पुनर्विकासातील प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत – विधानपरिषद उपसभापती अहिर

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबईतील जुन्या इमारती, चाळी तसेच पुनर्विकास प्रकल्पांतील रहिवाशांचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी दिले. विधानभवनातील दालनात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.बैठकीत कलशेटकर कंपाउंड येथील ९५ वर्षे जुन्या 'राम दास मंडळा'स पुनर्विकसित इमारतीमध्ये योग्य जागा उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच हररवाला बिल्डिंग क्र. १८ व १९ मधील रहिवाशांना पुनर्विकासादरम्यान देण्यात येणाऱ्या भाड्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींचा आढावा घेण्यात आला.

याशिवाय यदुवंशी अहिर ग्वाल सकल पंच, कृष्ण छाया (दुरुस्ती इमारत), खिमजी नाणजी कोठारी चाळ, अयोध्या सोसायटी तसेच वॉर्डन वकील चाळ येथील रहिवाशांच्या विविध समस्या आणि तक्रारींवरही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पुनर्विकास प्रक्रियेत मूळ रहिवासी किंवा स्थानिक संस्थांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही, याची दक्षता घेऊन प्राप्त तक्रारींवर तातडीने सकारात्मक कार्यवाही करावी. तसेच पात्र रहिवाशांना लवकरात लवकर दिलासा मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश उपसभापती सचिन अहिर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# दशनाम गोसावी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा संकल्प; २ ऑगस्टला लातूरमध्ये रंगणार भव्य पंचसूत्री सोहळा

### पत्रकार परिषदेत धर्मवीर भारती व व्यंकटेश पुरी यांनी जागवल्या देव, देश अन् धर्माच्या स्मृती!

**लातूर/प्रतिनिधी :** दशनाम गोसावी समाजाने देव, देश आणि धर्माच्या रक्षणासाठी ऐतिहासिक आणि अतुलनीय योगदान दिले आहे. हा गौरवशाली इतिहास डोळ्यांसमोर ठेवूनच, समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि पुढील पिढीला सक्षम करण्यासाठी आमचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत, असे प्रतिपादन व्यंकटेश पुरी आणि प्रतिष्ठित उद्योजक धर्मवीर भारती यांनी केले. दशनाम गोसावी समाज, लातूर या सामाजिक संस्थेच्या वतीने रविवार, दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोजी लातूर येथील भालचंद्र ब्लड बँक सभागृहात सकाळी १०:०० वाजता आयोजित भव्य पंचसूत्री सोहळ्याची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते संयुक्तपणे बोलत होते. गेली ३१ वर्षे, म्हणजेच १९९६ पासून दशनाम गोसावी समाज ही संघटना लातूरमध्ये समाजकार्यात अत्यंत सक्रियपणे कार्यरत असून अनेक वैविध्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना सातत्याने प्रोत्साहन देत आहे, हाच वारसा पुढे नेत या भव्य कार्यक्रमाची अधिकृत घोषणा करण्यात आली.




या पत्रकार परिषदेत उद्योजक धर्मवीर भारती यांच्या समाज उन्नतीसाठीच्या मोठ्या योगदानाचा आणि त्यांनी समाजातील होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी वेळोवेळी पुढे केलेल्या मदतीच्या हाताचा विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी गोसावी वुमन्स विंगच्या सुरेखा धर्मवीर भारती (भारती मॅडम) यांनी आपले मनोगत व्यक्त करताना प्रतिष्ठानच्या व्यापक उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या की, २ ऑगस्ट रोजी होणारा हा पंचसूत्री सोहळा केवळ एक कौतुक सोहळा नसून समाज बांधणीसाठी घेतलेला एक ध्यास आहे. समाजातील गरजू महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी भारती फाउंडेशनच्या वतीने शैक्षणिक साहित्यासोबतच शिलाई मशीन वाटप केवळ एवढ्यावरच न थांबता हळदीकुंकू आणि विविध सांस्कृतिक सणांच्या माध्यमातून आपली संस्कृती जपण्याचे काम ही विंग करत आहे. समाजातील विधवा महिलांना सन्मानाने मुख्य प्रवाहात आणून, त्यांना आत्मनिर्भर बनवण्याचा आमचा दृढ संकल्प आहे. कार्यपद्धतीत सकारात्मक बदल घडवून आणणे, हाच यामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतात स्पष्ट केले.

या महत्त्वपूर्ण पत्रकार परिषदेत अल्का गोसावी यांच्यासह विनायक गिरी, राजेंद्र गिरी, मोती गिरी गोसावी, मकरंद गिरी, प्रमोद बन, पद्माकर गिरी, विश्वजीत गिरी, चंद्रशेखर गिरी आणि बाळासाहेब भारती आदी प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. २ ऑगस्ट रोजी होणाऱ्या या मुख्य सोहळ्याला प्रमुख पाहुणे आणि उद्घाटक म्हणून हभप श्री. महादेव महाराज चाकरवाडीकर तसेच प्रमुख वक्ते म्हणून हभप श्री. अविनाशजी भारती महाराज, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. स्वप्निल भय्या भारती, प्रमुख अतिथी सूर्यकांता गिरी गोसावी, पुणे यांच्या सह महाराष्ट्राच्या विविध कोपऱ्यांतून नामांकित व्यक्ती श्री. सुखदेव गिरी (कोल्हापूर), श्री. अनुप गोसावी (नाशिक), श्री. ओमप्रकाश गिरी (बीड), श्री. मुन्ना गिरी गोसावी, पंढरपूर आणि श्री. गणेश पुरी (नागपूर) हे प्रामुख्याने उपस्थित राहून कार्यक्रमाचे उद्घाटन व मार्गदर्शन करणार आहेत. या सोहळ्यात सत्कार आणि स्कॉलरशिपचा लाभ मिळवण्यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या मार्क मेमोसह ९९२०६ २११११ (मयूर भारती प्रॉपर्टीज ऑफिस) या क्रमांकावर त्वरित संपर्क साधून आपली नावनोंदणी करून घेणे आवश्यक आहे. लातूरच्या या ऐतिहासिक आणि प्रबोधनपर सोहळ्यास दशनाम गोसावी समाजातील सर्व समाज बांधव, भगिनी, आणि युवक-युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उद्घाटकांच्या विचारांचा लाभ घ्यावा आणि कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे नम्र आवाहन दशनाम गोसावी समाज, लातूरच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या सांगतेनंतर उपस्थित सर्वांसाठी प्रीती भोजनाचे देखील आयोजन करण्यात आले आहे.

## राज्यस्तरीय शेतीमित्र पुरस्कारप्राप्त विठ्ठल कटके यांचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत दिला जाणारा राज्यस्तरीय वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार रेणापूर येथील ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल कटके यांना मिळाल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी अभिनंदन केले.

मुंबई येथे कृषी दिनी आयोजित एका कार्यक्रमात राज्याचे महामहीम मा. राज्यपाल जिष्णूदेव वर्मा आणि कृषीमंत्री दत्तात्रय भरणे व इतर अनेक मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. शेतीविषयक समस्या, शेतकऱ्यांच्या अडचणी, कृषी विभागाच्या विविध योजना तसेच शेतीतील सकारात्मक प्रयोग यांना प्रसिद्धी देत विठ्ठल कटके यांनी कृषी क्षेत्राशी संबंधित विषय सातत्याने मांडले. त्यांच्या या कार्याची शासनस्तरावर दखल घेत राज्यस्तरीय वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्काराने गौरव करण्यात आला. सदरील पुरस्कार



मिळाल्याबद्दल लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर येथील ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल कटके यांचा यथोचित सत्कार करून भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी अभिनंदन केले. यावेळी रेणापूर तालुक्यातील विविध वृत्तपत्राचे पत्रकार रफीक शिकलकर, सिद्धार्थ चव्हाण, चंद्रकांत कातळे, सुधाकर दहिफळे, बालाजी कटके, आर. डी. अपसिंगेकर, निजाम शेख, नामदेव शिंदे, ईश्वर बद्दर, भरत भोसले, कोंडीराम काळे यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.

## हवाईदलातर्फे नागपूर जवळील घोराड गावात फ्रीडम हेल्थ कॅम्पचे आयोजन

**नागपूर/प्रतिनिधी :** 'मिशन लाईफ' उपक्रमाअंतर्गत, नागपूर जिल्ह्यातल्या कळमेश्वर तालुक्यातील घोराड गावात २६ जुलै रोजी 'फ्रीडम हेल्थ कॅम्प' (उत्तम आरोग्यासह स्वातंत्र्याचा उत्सव) या विविध वैद्यकीय सुविधांनी युक्त अशा आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम भारतीय हवाई दलाच्या 'हवाई दल कर्मचारी कुटुंब कल्याण संघटना (प्रादेशिक), मेंटेनन्स कमांड यांच्या विद्यमाने आयोजित करण्यात आला होता; यातून भारतीय हवाई दलाची समाज कल्याण आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेप्रती असलेली कटिबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

या शिबिराचे उद्घाटन एअर मार्शल यल्ला उमेश, व्हीएसएम, पीएचडी, एअर ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ, मेंटेनन्स कमांड, आयएएफ यांच्या हस्ते झाले. या शिबिरात ६०० हून अधिक गावकऱ्यांना जेनरिक औषधे, कान,नाक आणि घश्याचे विकार, नेत्ररोग, शस्त्रक्रिया, स्त्रीरोग, बालरोग आणि दंतसेवा यांसारख्या विविध व्याधींवर मोफत प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी आणि विशेषज्ञांचा सल्ला, तसेच सामान्य बाह्यरुग्ण सेवा (ओपीडी) प्रदान करण्यात आली. सशस्त्र दल वैद्यकीय सेवेच्या मेंटेनन्स कमांड मुख्यालयांचे प्रधान वैद्यकीय अधिकारी एअर व्हाइस मार्शल सचिन एस. शौचे, यांच्या नेतृत्वाखालील तज्ञ वैद्यकीय पथकाने सर्वसमावेशक आरोग्य सेवा विनामूल्य उपलब्ध करून दिल्या. गावातील रहिवाशांची प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी आणि दंत तपासणी देखील करण्यात आली. पुढील वर्षभर, मेंटेनन्स मुख्यालय नियमित अंतराने अशाच प्रकारच्या, विविध वैद्यकीय सुविधांनी युक्त अशी वैद्यकीय शिबिरे आयोजित करणार आहे, जेणेकरून शाश्वत आरोग्य सहाय्यता सुनिश्चित होईल आणि निरोगी समाज वाढीस लागेल.

निरोगी आणि निरामय आरोग्याला चालना देण्यासाठी संपूर्ण शिबिराच्या आवारात फिट फॉर लाईफ आणि 'हलके खा, योग्य तेच खा' (इट लाइट, इट राइट) अशा आशयांचे जागृतीपर फलक लावण्यात आले होते. बालकांचे आरोग्य, पोषण आणि शिक्षणाप्रती असलेली बांधिलकी अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने, 'हवाई दल कर्मचारी कुटुंब कल्याण संघटना (प्रादेशिक)च्या अध्यक्षा यल्ला श्रीवल्ली यांनी गावातील गरजू मुले तसंच अंगणवाडीतील मुलांना पोषण-आहार संच, क्रीडा साहित्य आणि वह्या-पुस्तकांचे वाटप केले.

## दिवेआगर येथे सुसज्ज अ‍ॅक्वेरियम उभारणीचा सविस्तर प्रकल्प आराखडा तातडीने सादर करण्याचे निर्देश – मंत्री आदिती तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील प्रमुख पर्यटनस्थळ असलेल्या दिवेआगर येथे पर्यटकांच्या आकर्षणात भर घालण्यासाठी अत्याधुनिक व सुसज्ज अ‍ॅक्वेरियम उभारण्याबाबतचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करून तो मंजुरीसाठी तातडीने शासनाकडे सादर करावा, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिवेआगर परिसरातील पर्यटन विकासासंदर्भातील विविध बाबींचा आढावा घेण्यात आला.

अ‍ॅक्वेरियम प्रकल्पाचा सविस्तर आराखडा तयार करून तो तातडीने शासनाच्या मंजुरीसाठी सादर करावा, असे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. तसेच, प्रकल्पाचे नियोजन करताना पर्यटकांच्या गरजा, स्थानिक पर्यटनाला चालना आणि परिसराच्या सर्वांगीण विकासाचा विचार करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. दिवेआगरच्या पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी आवश्यक कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देशही महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

बैठकीस रायगड जिल्हा नियोजन अधिकारी, पर्यटन संचालनालयाचे संचालक, कार्यकारी अभियंता तसेच पर्यटन विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रकल्पाच्या तांत्रिक, प्रशासकीय आणि आर्थिक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# अभ्यासिका-बौध्द विहार मंजूरी न्यायासाठीचा लढा सुरूच राहणार!

### बौद्ध नगर अभ्यासिका-विहार आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अहमदपूर/प्रतिनिधी :** अहमदपूर शहरातील बौद्ध नगर येथे अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत दलित वस्ती नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत अभ्यासिका-बूध्द विहार विद्यार्थ्यांसाठी मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासिका केंद्राच्या कामाला जाणीवपूर्वक अडथळे निर्माण करून मंजूर विकासकाम रद्द करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याच्या निषेधार्थ युवक नेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली काल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर भव्य धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात नागरिक, युवक, महिला, विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत न्यायाच्या लढ्याला भक्कम पाठिंबा दिला.

बौद्ध नगर समाज बांधवांनी पुढाकार घेवून बुध्द विहारासाठी पूढाकार घेतला होता.सोबतच विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवक-युवतींना अभ्यासासाठी स्वतंत्र जागा मिळावी आणि परिसराच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळावी या उद्देशाने अभ्यासिका-बौध्द विहार केंद्रासाठी निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र प्रशासनातील काही जातीयवादी अधिकाऱ्यांनी संगनमताने या मंजूर कामाला अडथळा निर्माण करून ते रद्द करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे समाजामध्ये तीव्र संताप आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा संघर्ष केवळ बुध्द विहार निर्मितीसाठी नसून या बूध्द विहारात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कासाठी, सामाजिक न्यायासाठी आणि मंजूर विकासकाम वाचविण्यासाठीचा आहे. शासनाने दलित समाजासाठी राखीव असणाऱ्या निधीतून हे काम मंजूर केलेले आहे ते रद्द करणे किंवा त्यात अडथळे निर्माण करणे हे बौध्द समाजावरील तसेच विद्यार्थ्यांवर अन्याय करणारी बाब असल्याची भावना आंदोलनात व्यक्त करण्यात आली.या संदर्भातील निवेदन यापूर्वी जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडे अपील स्वरूपात दिलेले आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून जातीयवादी अधिकाऱ्यांनी अधिकाराचा दूरूपयोग करून मंजूर कामास अडथळा निर्माण करणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करावी, अभ्यासिका-बौध्द विहार केंद्राचे मंजूर काम तातडीने सुरू करावे अशी ठाम मागणी करण्यात आली.

यावेळी युवक नेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी सांगितले की, ''हा लढा केवळ एका इमारतीचा नाही, तर भावी पिढीच्या शैक्षणिक भवितव्याचा आहे. समाजातील गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाची चांगली सुविधा मिळावी, हा आमचा प्रामाणिक हेतू आहे. प्रशासनाने तातडीने न्याय दिला नाही, तर संविधानिक आणि लोकशाही मार्गाने हा संघर्ष अधिक तीव्र करण्यात येईल.समाजासाठीचा हा लढा शेवटच्या क्षणापर्यंत न्याय मिळेपर्यंत सुरूच राहील, असा निर्धार



यावेळीस आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला. या अंदोलनात माजी आमदार बब्रुवानजी खंदाडे साहेब,तक्षशिला बुध्द विहार काळेगांव चे पुज्य भंते महाविरो थेरो, नगरसेविका सौ.तनूजाताई सूर्यवंशी, शहराध्यक्ष बजरंग गायकवाड, भगवानराव ससाणे,माजी नगरसेवक शेषराव ससाणे, संतोष गायकवाड,वसंतराव कदम,सचिन बानाटे, बाळासाहेब आगलावे, नगरसेवक मुनाभाई सय्यद, आकाश पवार, राहुल, वाघमारे, संविधान कदम, रवी बनसोडे, शरद बनसोडे, अमोल मोरे, प्रकाश लांडगे, अभि गायकवाड, बालाजी हनुमंते, शेख चांद सौदागर, डॉ.बालाजी थीट्टे, मेघराज गायकवाड, आनंद सोनकांबळे, संतोष पिल्लवटे,रितेश रायभोळे, जय गुळवे,रत्नदीप परचंडेकर,चंद्रकांत कांबळे, रोहन कांबळे, दिनेश तिगोटे,धोंडूतात्या शिंदे आदींनी सहभाग नोंदविला.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.